Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक १० ] बुधवार, मार्च २५, २०२६/चैत्र ४, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ५५.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

### संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १२.

### उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९ खालील अधिसूचना**

क्रमांक कावि-अ.का.-प्र-२-२५१-२५५-२०२६.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या चंद्रपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३० ) (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त अधिनियम” असा केला आहे ) याच्या कलम ११ च्या पोटकलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, अधिसूचना महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११-२०१४-प्र.क्र. ७७-अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ अन्वये प्रकरण क्रमांक १२-६५-२०२५-२६, दिनांक १० डिसेंबर, २०२५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे, की यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी,चंद्रपूर (जिल्ह्याच्या) जिल्हाधिकाऱ्यांने कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र व बाधित कुटूंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी “पुनर्वसाहत” क्षेत्र म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असुन, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मुल, जि. चंद्रपूर यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची–एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक- १२-६५-२०२५-२०२६, गाव मुल, तालुका मुल, जिल्हा चंद्रपूर.

| अ. क्र. | भूमापन क्रमांक किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ६२३ | ० २५ |
| २ | ५०१ | ० ०६ |
| ३ | २९५ | ० १९ |
| ४ | २९४ | ० २२ |
| ५ | ६९४/१ | ० १० |
| ६ | ७३७ | ० ०३ |
| | गाव चिचोली, तालुका मुल, जिल्हा चंद्रपूर | |
| ७ | ७६ | ० १० |
| | एकूण बेरीज . . | ० ९५ |

**अनुसूची–दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नाव :- कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग क्रमांक २, चंद्रपूर अंतर्गत.

प्रकल्प कार्याचे वर्णन :- चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर-मुल-गडचिरोली रा.मा. ९३० वर मुल शहराकरीता बाह्य वळण मार्गाचे बांधकामाकरीता.

**अनुसूची-तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन**

- निरंक -

**अनुसूची–चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश**

- निरंक -

**टीप** - उक्त जमिनीच्या बाबत माहिती तथा नकाशे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मूल यांचे कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.

**अजय चरडे,**

उपविभागीय अधिकारी तथा

भूसंपादन अधिकारी, मुल.

मुल :

दिनांक २० मार्च, २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.